**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. दत्तात्रय रमाकांत सवाई
९९७/६, नवी पेठ, सत्संग सोसायटी, पुणे .. अपीलकर्ता

विरूध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता,
बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभाग
झोन क्र.३, पुणे महानगरपालिका, पुणे-5

.. उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा**
सहाय्यक अभियंता,
बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभाग
झोन क्र.३, पुणे महानगरपालिका, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | **अपील क्रमांक** | २६९ / २०१० / पुणे |
| २ | **सुनावणीची तारीख** | २६.५.२०१० |
| ३ | **उपस्थित** | |
| | **अपीलकर्ता -** श्री. दत्तात्रय रमाकांत सवाई<br>९९७/६, नवी पेठ, सत्संग सोसायटी, पुणे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,<br>बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभाग<br>झोन क्र.३, पुणे महानगरपालिका, पुणे-५ तर्फे प्रतिनिधी<br>श्री. सुधीर भगवान पानसरे | |
| ४ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

सत्संग गृहरचना संस्थेच्या रिव्हाईज्ड लेआऊट बाबत व त्याअनुषंगाने भूखंड क्र. ९१, ९२ च्या खाजगी पातळीवरील एकत्रीकरणाविषयी योग्य माहिती महानगरपालिकेकडून दिली जात नाही. संपूर्ण प्रकरणात महानगरपालिकेने केलेली कार्यवाही अयोग्य आहे, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. दत्तात्रय रमाकांत सवाई यांनी केली.

संबंधित संस्थेबाबत त्याच मुद्दयावर अपीलकर्ता सातत्याने पत्रव्यवहार, अर्ज व अपिले करीत आले आहेत. आयोगाच्या दि. २१.५.२००७ च्या आदेशानुसार नगर अभियंत्यांसह संबंधित सर्व अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक घेऊन अनुषंगिक माहितीबाबत चर्चा करून अहवाल सादर करण्यात आला आहे. तसेच श्री. सवाई यांना माहिती देण्यात आली आहे. आपण म्हणतो त्याच स्वरूपात कागदपत्रांच्या प्रती मिळाव्यात, अशी त्यांची मागणी आहे. परंतु अभिलेखानुसार सर्व माहिती श्री. सवाई यांना वेळोवेळी देण्यात आली असून अवलोकनासाठी सर्व संचिका उपलब्ध आहेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. सुधीर भगवान पानसरे यांनी केले.

श्री. सवाई यांनी उपस्थित केलेले आक्षेप माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाचे नाहीत. त्यांना माहिती देण्यात आली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 29 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. सुनिलकुमार बावधनकर
हिरामण लांडे बिल्डिंग, कासारवाडी,
मुंबई-पुणे रोड, पुणे-३४

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा शहर अभियंता,**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी, पुणे-१८

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
'ड' प्रभाग, स्थापत्य पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी, पुणे-१८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७०६/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** अतिक्रमण हटवणेबाबत दि.३/०१/२००८ रोजी काढलेले नोटीस क्र.४३/२००८ व ४४/२००८ या नोटीसीच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबतचा सविस्तर तपशील | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. सुनिलकुमार बावधनकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलीय प्राधिकारी तथा शहर अभियंता, पिंपरी चिंचवड, महानगरपालिका, यांनी दि. ४/११/२००८ रोजी दिलेला निर्णय योग्य असून तो कायम करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपिलीय प्राधिकारी तथा शहर अभियंता, पिंपरी चिंचवड, महानगरपालिका, यांनी दि.४/११/२००८ रोजी दिलेल्या निर्णयानुसार जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पिंपरी चिंचवड, महानगरपालिका, पुणे यांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दि.१७/०७/२०१० पर्यंत आयोगास सादर करावा

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 21 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.रामेश्वर पाटीलबा नागरे
मु.पो.दोंदे, ता.खेड,
जि.पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),**
जिल्हा परिषद पुणे,
पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,**
माध्यमिक विद्यालय कुळे,
ता.मुळशी, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७२०/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** दि.१४/०८/२००८ च्या माहिती-मागणी अर्जास अनुसरुन संबंधित कागदपत्रांच्या छायाप्रतींच्या खर्चाचा सविस्तर तपशील विहित नमुन्यात कळवावा | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.२४/०२/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता.

'अपीलकर्ता श्री. रामेश्वर पाटीलबा नागरे यांनी प्रथम पत्रामध्ये सन १९९५ ते २००८ पर्यंतची माहिती मागितली होती, तर नंतरच्या पत्रामध्ये जून १९९५ ते ९८ पर्यंतची माहिती मागितली असल्याने खर्च तपशिलात तफावत जाणवते. अपीलकर्ता श्री.नागरे हे वारंवार तीच माहिती मागत असल्यामुळे कामात व्यत्यय येतो', असे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, माध्यमिक विद्यालय कुळे, श्री.लक्ष्मण कुंडलीक दराडे यांनी प्रपत्रात नमूद केले आहे, तर 'माहिती अधिकारी यांनी दि.२३/०८/२००८ च्या पत्रान्वये रु.२१३०/- भरण्यास कळविले. परंतु अपीलकर्त्याने पैसे न भरता तपशील मागण्यासाठी दोन-तीन वेळा पत्रव्यवहार केला. नियमाप्रमाणे वेळेत पत्र पाठवून माहिती अधिकाऱ्यांनी पूर्तता केली आहे. अपीलकर्त्याने खर्चाची रक्कम भरल्यास माहिती अधिकारी माहिती देण्यास तयार आहेत', असे अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, माध्यमिक विद्यालय कुळे व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 24 JUN 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रेमकुमार सुंदरलाल आगरवाल
अगरवाल निवास, बोपखेल, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस उपआयुक्त,
परिमंडळ-१, पुणे शहर, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, डेक्कन विभाग, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७२६ ते २७३० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.५.२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री.प्रेमकुमार सुंदरलाल आगरवाल<br>अगरवाल निवास, बोपखेल, पुणे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,<br>डेक्कन विभाग, पुणे श्रीमती सविता सुहास तुरेकर | |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२५.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलांचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलांची सुनावणी दि.२१.५.२०१० रोजी घेण्यात आली.

डेक्कन पोलीस ठाण्याचे तत्कालीन पोलीस निरीक्षक श्री.जयवंत देशमुख यांच्या चौकशीचा अहवाल, आपला संबंध असलेल्या एका प्रकरणाच्या संदर्भातील दहा दिवसाच्या पोलीस ठाणे दैनंदिनीतील नोंदीची प्रत आदी माहिती आपण जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, डेक्कन विभाग, पुणे यांच्याकडे विविध अर्जाद्वारे मागितली होती. संबंधित प्रकरणात पोलीस ठाण्यातून आपण निघून गेल्यानंतर ठाणे दैनंदिनीत तत्कालीन पोलीस अधिकाऱ्यांनी आपल्याविरूध्द नोंदी केल्या असून त्या संदर्भातील न्यायालयीन प्रक्रियेसाठी ही माहिती आपल्याला मिळणे आवश्यक आहे. परंतु तपास चालू असल्याच्या व गोपनीयतेच्या कारणावरून बव्हंश माहिती नाकारण्यात आली. अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उपआयुक्त, परिमंडळ-१, पुणे शहर, पुणे यांनी अपिलाची योग्य दखल घेतली नाही. ठाणे दैनंदिनी निरीक्षणासही उपलब्ध करून दिली नाही. म्हणून आपण पाच अपिले केली आहेत. माहिती नाकारताना जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, डेक्कन विभाग, पुणे यांनी व अपिलाचा निर्णय देताना अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उपआयुक्त, परिमंडळ-१, पुणे शहर, पुणे यांनी पुढील अपिलाबाबतची तरतूद नमूद केलेली नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.प्रेमकुमार सुंदरलाल अगरवाल यांनी केले.

संबंधित प्रकरणाचा तपास चालू असल्यामुळे तपासावर परिणाम होऊ नये, म्हणून माहिती वा ठाणे दैनंदिनीचे निरीक्षण तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांनी नाकारले. श्री.देशमुख यांच्या चौकशीचा अहवाल पालीस आयुक्त कार्यालयाकडे पाठविण्यात आला असल्याचे कळविले. खाजगी फिर्यादीची माहिती न्यायालयात पाठविली असल्याने त्याची प्रत पोलीस अभिलेखात ठेवली जात नाही. ठाणे दैनंदिनीत विविध गुन्ह्यांच्या संदर्भातील नोंदी असतात. त्यातील अनेक प्रकरणांचा तपास चालू असतो. त्यामुळे सरसकट छायांकित प्रती देणे तपासावर परिणाम करणारे ठरू शकते, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, डेक्कन विभाग, पुणे श्रीमती सविता सुहास तुरेकर यांनी केले.

अपीलकर्त्याने मूळ नोंदीच्या संदर्भातच साशंकता व्यक्त केली असून त्यांच्या स्वतःच्या व संबंधित गुन्ह्याच्या संदर्भात केलेल्या नोंदी जाणून घेण्याचा त्यांना हक्क आहे. तसेच संबंधित पत्रव्यवहाराच्या प्रती, पोलीस निरीक्षक श्री.जयवंत देशमुख यांच्या चौकशीचा अहवाल ही माहिती गोपनीय ठरू शकत नाही. संबंधित प्रकरण न्यायालयात दाखल झाले असल्यास तपास चालू असून तपासावर परिणाम होण्याची शक्यता हे कारण समर्थनीय ठरू शकत नाही. मात्र पोलीस ठाणे दैनंदिनीतील सर्व नोंदींच्या प्रती अपीलकर्त्यास देणे आवश्यक नाही. तशी मागणी अपीलकर्त्याने करणे योग्य नाही. म्हणून अपीलकर्त्यास संबंधित कालावधीतील ठाणे दैनंदिनी व आवक-जावक बारनिशीचे निरीक्षण करू द्यावे आणि त्यांच्याशी व संदर्भित गुन्ह्याशी संबंधित कागदपत्रांच्या प्रती, पोलीस निरीक्षक श्री.जयवंत देशमुख यांच्या चौकशीचा अहवाल व त्यातील अनुषंगिक जाबजबाबाच्या प्रती इ. माहिती तीन दिवसांत अपीलकर्त्यास द्यावी. ठाणे दैनंदिनीच्या संबंधित पृष्ठांमध्ये अन्य गुन्ह्यांची नोंद असल्यास ती आच्छादित करून ऊर्वरित पानांची प्रत अपीलकर्त्यास द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार अपीलकर्त्यांनी दि.२९.५.२०१० रोजी अभिलेखांचे अवलोकन केले व संबंधित माहिती त्यांना देण्यात आली, असे दिलेल्या माहितीच्या यादीसह जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, डेक्कन विभाग, पुणे श्रीमती सविता सुहास तुरेकर यांनी दि.२.६.२०१० च्या अहवालान्वये आयोगास अवगत केले. अपीलकर्त्याची माहिती मिळाल्याची पोहोच असलेली प्रत त्यांनी सोबत सादर केली.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
30 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. राजेश पन्नालाल नहार
शितलबाग कॉम्प्लेक्स, [.नं.४, फ्लॅट नं.१,
भोसरी, पुणे-३९ .. अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रशासन अधिकारी,
शिक्षण मंडळ, पिंपरी चिंचवड
महानगरपालिका, पुणे-४११ ०१८ .. उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक प्रशासन
अधिकारी, शिक्षण मंडळ, पिंपरी चिंचवड
महानगरपालिका, पुणे-४११ ०१८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७६ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | २६.५.२०१० |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. राजेश पन्नालाल नहार
शितलबाग कॉम्प्लेक्स, [.नं.४, फ्लॅट नं.१, भोसरी, पुणे-३९

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रशासन अधिकारी,
शिक्षण मंडळ, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे-४११ ०१८
श्री. हरी भारती

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८.१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५.२.२०१० |

| | |
|---|---|
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे यांच्याकडे आपण मागितलेली माहिती कधीही विहित मुदतीत दिली जात नाही. अर्धवट व एक महिना विलंबाने माहिती दिली. अवलोकनासाठी मागितलेली संचिका ३४ दिवसांनी उपलब्ध करून दिली. त्यातील छायांकित प्रतींसाठी पुन्हा अर्ज करावयास सांगितले. माहिती टाळण्याचा हा प्रकार आहे, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. राजेश पन्नालाल नहार यांनी केली.

शालेय विद्यार्थ्यांना मोफत पुरविण्यात येणाऱ्या शालेय साहित्याचा पुरवठा करणाऱ्या ठेकेदारांमध्ये श्री. नहार यांचा समावेश आहे. दि. ३०.६.२००९ च्या अर्जान्वये स्पर्धक ठेकेदारांविषयी ३२ मुद्दयांची माहिती त्यांनी मागितली होती. अर्ज दि. १.७.२००९ रोजी प्राप्त झाला. दि. ४.८.२००९ रोजी माहिती तयार असल्याचे समक्ष सांगून देऊ केली असता श्री. नहार यांनी दि. १३.८.२००९ रोजी नेली. दि. १२.११.२००९ च्या अर्जान्वये मागणी केल्यानुसार त्यांनी दि. १७.१२.२००९ रोजी संचिकेचे अवलोकन केले व त्याच दिवशी छायांकित प्रतींसाठी अर्ज दिला. संबंधित प्रकरण वादग्रस्त असल्यामुळे निर्णयासाठी संचिका महानगरपालिका आयुक्तांकडे दाखल केली होती. चालू असलेल्या कार्यवाहीची प्रक्रिया पूर्ण झाल्याशिवाय छायांकित प्रती व अनुषंगिक माहिती देणे शक्य नव्हते, याची कल्पना श्री. नहार यांना दिली होती, असे प्रतिपादन श्री. रामदास देशमुख, लिपिक, शिक्षण मंडळ, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे यांनी केले. अन्य एका व्यक्तीने याच स्वरूपाची माहिती मागणारा अर्ज केला होता, तोही श्री. नहार यांच्या वतीने असल्यामुळे त्याबाबत संबंधित व्यक्तीला विचारणा केली होती, असे प्रतिपादन श्री. रामदास देशमुख, लिपिक, शिक्षण मंडळ, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे यांनी केले. परंतु या व्यक्तीचा व आपला काहीही संबंध नसून त्या व्यक्तीला दमदाटी करण्यात आली व त्याबद्दलची तक्रार त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे केली आहे, असे श्री. नहार यांनी सांगितले.

माहिती न मिळाल्याच्या कारणावरुन श्री. नहार यांनी केलेल्या अपिलाच्या आपल्या तारखेच्या सुनावणीला ते उपस्थित नव्हते. दुसरी तारीख देऊन दि. १५.२.२०१० रोजी सुनावणी घेतली. माहिती

नि:शुल्क मिळाल्यास आपली तक्रार नाही, असे श्री. नहार यांनी त्यावेळी सांगितले व त्याच दिवशी दिलेली माहिती त्यांनी स्वीकारली, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे श्री. हरी भारती यांनी केले.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे यांनी संबंधित कार्यवाहीबाबत लेखी खुलासा करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे श्रीमती शारदा लोंढे यांनी दि. २९.५.२०१० च्या पत्रान्वये खुलासा सादर केला.

'दि. १७.१२.२००९ चे अर्जान्वये मागविणेत आलेल्या कागदपत्रांची झेरॉक्स विहित वेळेत न देणेबाबतचे कारण म्हणजे मे. लिबर्टी कं. यांनी अपूर्ण पुरवठा केल्याने त्यांना काळ्या यादीमध्ये टाकणेची कार्यवाही प्रस्तावित असल्याने सदरची नस्ती अतिरिक्त आयुक्त, आयुक्त यांचेकडे असल्याने कागदपत्रांची झेरॉक्स काढणेकामी उपलब्ध होऊ शकली नाही. त्यामुळे मागविणेत आलेल्या कागदपत्रांची झेरॉक्स विहित वेळेत देणे शक्य झाले नाही. दरम्यान कागदपत्रांची झेरॉक्स तयार असताना श्री. राजेश नहार यांना कागदपत्रांची झेरॉक्स घेऊन जाणेबाबत वारंवार सूचना देऊनही त्यांनी कागदपत्रांची झेरॉक्स घेणेस टाळाटाळ केली'.

'श्री. नहार यांनी वेळोवेळी मागविलेली सर्व माहिती उपलब्ध कागदपत्रांवरून पूर्ण देण्यात आलेली आहे. श्री. नहार महानगरपालिका शिक्षण मंडळामध्ये ठेकेदार आहेत. सन २००९-१० नवे बूट पुरवठ्यामध्ये मी सहा. प्रशासन अधिकारी या नात्याने त्यांचे बूट पुरवठा तपासणी करताना त्यांनी ठरवून दिलेल्या कंपनीच्या बूटापेक्षा वेगळ्याच कंपनीचे जूने बूट पुरवठा करत असल्याचे निदर्शनास आल्याने त्याची तक्रार शिक्षण मंडळाकडे केल्याने श्री. नहार वैयक्तिक आकसापोटी माहिती अधिकाराचा गैरवापर करून कार्यालयास त्रास देत आहे. श्री. नहार यांनी वेळोवेळी अर्ज करून तीच तीच माहिती पुन्हा पुन्हा मागविली आहे. श्री. नहार कार्यालयात जवळ जवळ दररोज येत असतानासुध्दा तयार असलेली माहिती, पत्र घेण्यास टाळाटाळ करतात. श्री. नहार यांनी मागविलेली सर्व माहिती त्यांना

देणेत आलेली आहे. माहिती देणेस टाळाटाळ केलेली नाही,' असे जन माहिती अधकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे श्रीमती शारदा लोंढे यांनी या खुलाशात नमूद केले आहे. श्री. नहार यांना देऊ केलेली माहिती व पत्र आदींचा तपशील त्यात नमूद केला आहे.

वरील सर्व बाबी लक्षात घेता जन माहिती अधिकारी व सहाय्यक प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे

दि. 15 JUN 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

ॲड. विजयराव ज्ञानेश्वर दाभाडे .. अपीलकर्ता
रा. यशवंतनगर, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि.पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, मावळ
तहसील कार्यालय, मावळ, जि. पुणे .. उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, मावळ
तहसील कार्यालय, मावळ, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३७२ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | २१.५.२०१० |
| ३ | **उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, मावळ<br>तहसील कार्यालय, मावळ, जि. पुणे श्री. राजेश चव्हाण | |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

**<u>विवेचन</u>**

राज्य माहिती आयोगाने दि. १५.७.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. २१.५. २०१० रोजी सुनावणी घेण्यात आली.

अपीलकर्ता ॲड. विजयराव ज्ञानेश्वर दाभाडे यांना माहिती दिली आहे. मुद्दा क्र. २ व ३ मध्ये त्यांनी खुलासा विचारला असून ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. मुद्दा क्र. ४ मध्ये शासकीय नियमावलीची माहिती विचारली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, मावळ जि. पुणे श्री. राजेश चव्हाण यांनी केले. ते रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.** 30 JUN 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. यशवंत रावजी जगताप
मु. पो. कान्हाटी, ता. बारामती, जि. पुणे .. अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मंडलाधिकारी, सुपा,
ता. बारामती, जि. पुणे .. उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कामगार तलाठी, कान्हाटी,
ता. बारामती, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७७४ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | २८.५.२००९ |
| ३ | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** - श्री. यशवंत रावजी जगताप<br>मु. पो. कान्हाटी, ता. बारामती, जि. पुणे<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा मंडलाधिकारी, सुपा,<br>ता. बारामती, जि. पुणे श्री. एस. डी. माकर<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा कामगार तलाठी, कान्हाटी,<br>ता. बारामती, जि. पुणे श्री. एस. एम. जराड | |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. २४.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. २८.५.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली.

तलाठी कार्यालयात काम करणाऱ्या तीन कर्मचाऱ्यांबाबतची जन माहिती अधिकारी तथा कामगार तलाठी, काऱ्हाटी, ता. बारामती यांनी दिलेली माहिती खोटी आहे. कर्मचाऱ्यांच्या हस्ताक्षरातील कागदपत्रांचा पुरावा आपण सादर केला असून तलाठयांवर कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. यशवंत रावजी जगताप यांनी केली.

श्री. जगताप यांना तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कामगार तलाठी, काऱ्हाटी, ता. बारामती श्री. एस. एल. इंगुले यांनी माहिती दिली आहे. अभिलेखानुसार ती योग्य आहे, असे प्रतिपादन विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कामगार तलाठी, काऱ्हाटी, ता. बारामती श्री. एस. एम. जराठ व अपिलीय प्राधिकारी तथा मंडलाधिकारी, सुपा, ता. बारामती श्री. एस. डी. माकर यांनी केले.

अपीलकर्त्याने नावे नमूद केलेल्या कर्मचाऱ्यांचे हस्ताक्षर त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रात आहे, असे अपीलकर्त्याचे म्हणणे आहे. तथापि ते सिध्द करणे व संबंधित व्यक्ती तलाठी कार्यालयात कामाला होत्या असा निष्कर्ष त्यावरुन काढणे ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि. 30 JUN 2010

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ)

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रामदास बाबासाहेब खोत
सेक्टर नं.२८, प्लॉट नं.१११, मु.पो.निगडी प्राधिकरण, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तहसील कार्यालय कवठेमहांकाळ,
ता.कवठेमहांकाळ, जि.सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय कवठेमहांकाळ, ता.कवठेमहांकाळ, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७८ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.५.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रामदास बाबासाहेब खोत
सेक्टर नं.२८, प्लॉट नं.१११, मु.पो.निगडी प्राधिकरण, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तहसील कार्यालय कवठेमहांकाळ,
ता.कवठेमहांकाळ, जि.सांगली श्री.आर.जी.बोंबले

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय कवठेमहांकाळ, ता.कवठेमहांकाळ, जि.सांगली श्री.जे.आर.तराळ

| | |
|---|---|
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

वारस नोंदीबाबत आपण दाखल केलेल्या पत्रानुसार पुढील कार्यवाही निवासी नायब तहसीलदार, कवठेमहांकाळ व तहसीलदार, कवठेमहांकाळ यांनी केली नाही. जानेवारी २००७ पासून न्यायालयाकडे हे प्रकरण असून वारस नोंदीसाठी दि.५.१०.२००९ रोजी अर्ज केला आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. रामदास बाबासाहेब खोत यांनी केले.

श्री.खोत यांनी दिलेल्या वारस अर्जाची नोंद घेतली असता त्यातील फेरफारावर तक्रार अर्ज असल्यामुळे मंडल अधिकाऱ्यांसमोर प्रकरण चालू हेते. तसे श्री.खोत यांना कळविले. त्यांचा निर्णय झाल्यानंतर तोही त्यांना कळविला. प्रकरण न्यायालयाकडे पाठविणे ही प्रशासकीय कार्यवाहीची बाब असून त्याबाबतची प्रक्रिया करण्यात येत असल्याचेही त्यांना स्पष्ट केले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय कवठेमहांकाळ, ता.कवठेमहांकाळ, जि.सांगली श्री.जे.आर.तराळ व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय कवठेमहांकाळ, ता.कवठेमहांकाळ, जि.सांगली श्री.आर.जी.बोंबले यांनी केले. श्री.खोत याच विषयाबाबत वारंवार अर्ज करीत असतात, असेही त्यांनी नमूद केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे. त्यांची मुख्य मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
30 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.मधुकर ज्ञानोबा टकले
फ्लॅट क्र.१३, सावंत गार्डन,
पुणे-सातारा रोड,
कात्रज, पुणे-४६

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सचिव,**
झिल एज्युकेशन सोसायटी,
सर्व्हे नं.३९, नऱ्हे, ता.हवेली,
जि.पुणे

**उत्तरवादी**

**१. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,**
झिल एज्युकेशन सोसायटीचे,
ज्ञानगंगा इन्स्टिटयूट ऑफ करिअर एम्पॉवरमेंट ॲण्ड रिसर्च,
सर्व्हे नं.३९, नऱ्हे, ता.हवेली,
जि.पुणे

**२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,**
झिल एज्युकेशन सोसायटीचे,
ज्ञानगंगा पॉलिटेक्निक कॉलेज,
सर्व्हे नं.३९, नऱ्हे, ता.हवेली, जि.पुणे

**३. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,**
झिल एज्युकेशन सोसायटीचे,
ज्ञानगंगा कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग,
सर्व्हे नं.३९, नऱ्हे, ता.हवेली, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७९६/पुणे + २७९७/पुणे + २७९८/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** झिल एज्युकेशन सोसायटी, ज्ञानगंगा इन्स्टिटयूट ऑफ करिअर एम्पॉवरमेंट ॲण्ड रिसर्च, या संस्थेने शिक्षण शुल्क समितीस सादर केलेल्या प्रस्तावाची प्रत, प्रवेश पत्रिकेच्या वेळापत्रकाची व गुणवत्ता यादीची प्रत, जाहिरातीची प्रत | |

## विवेचन

सदर तिन्ही अपिलांचा समावेश राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.२४/०२/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त करण्यात आला होता. झिल एज्युकेशन सोसायटी, ज्ञानगंगा इन्स्टिटयूट ऑफ करिअर एम्पॉवरमेंट ॲण्ड रिसर्च या शिक्षण संस्थेस कोणत्याही प्रकारचे शासकीय अनुदान अथवा अर्थसहाय्य मिळत नाही. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ सदर शिक्षण संस्थेस लागू होत नाही, असे जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, ज्ञानगंगा इन्स्टिटयूट ऑफ करिअर एम्पॉवरमेंट ॲण्ड रिसर्च व प्राचार्य, ज्ञानगंगा पॉलिटेक्निक कॉलेज आणि प्राचार्य, ज्ञानगंगा कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग व अपिलीय प्राधिकारी तथा सचिव, झिल एज्युकेशन सोसायटी, नऱ्हे, ता.हवेली, जि.पुणे यांनी प्रपत्रात नमूद केले आहे.

विनाअनुदानित खाजगी शिक्षण संस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र.५१३२/२००८ मध्ये दिला आहे. उच्च न्यायालयाचा हा न्यायनिर्णय व जन माहिती अधिकाऱ्यांचे वरील प्रमाणे प्रतिपादन विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

वरील तीनही अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**पुणे.**
**दि :-** 18 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.ताराचंद शंकरराव पवार
१७६, औंधगांव, **अपीलकर्ता**
पुणे-४११ ००७

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक,**
सहकारी संस्था पुणे शहर (२),
साखर संकुल, शिवाजीनगर,
पुणे-५

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष /सचिव,**
देवकीनंदन नागरी सहकारी पतसंस्था,
३६, कसबा पेठ, पुणे-११

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८०९/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** देवकीनंदन नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, पुणे या संस्थेने केलेला इमारतीचा करारनामा, भाडे/अनामत रक्कम खर्ची टाकलेल्या खातेउताऱ्याची प्रत व तदनुषंगिक एकूण ९ मुद्दे | |

**<u>विवेचन</u>**

नागरी सहकारी बँका व नागरी सहकारी पतसंस्था यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय मंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र.५६६६/२००७ प्रकरणी दिलेला आहे. सबब सदरचे अपील दखलयोग्य ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 18 JUN 2010

आयोग, महाराष्ट्र खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. पांडुरंग बाबूराव बेनके
प्लॉट नं.१०, अक्षय क्लासिक,
आझादनगर, वानवडी,
पुणे-२२

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता,**
सार्वजनिक बांधकाम मंडळ,
मध्यवर्ती इमारत, 'बी' बरॅक,
पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
सार्वजनिक बांधकाम विभाग (पूर्व),
मध्यवर्ती इमारत, 'बी' बरॅक,
पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८३५/पुणे+२८३६/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १/१२/२००८, २०/०८/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २२/०९/२००८ |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १०/१०/२००८, १२/११/२००८ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** १) सार्वजनिक बांधकाम उपविभाग दौंड व शिरुर मधील विविध रस्त्यांच्या कामांची माहिती २) सार्वजनिक बांधकाम उपविभाग, दौंड यांनी लेखाशिर्ष ३०५४ खाली सन २००७-०८ मध्ये केलेल्या कामांचा तपशील ३) लेखाशिर्ष ३०५४ खाली केलेल्या सर्व कामांच्या मोजमाप पुस्तकांच्या छायाप्रती | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. पांडुरंग बाबूराव बेनके यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत सादर केलेल्या कागदपत्रांवरुन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (पूर्व), पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,पुणे यांनी केलेली कार्यवाही योग्य असल्याचे दिसून येते.

'श्री. बेनके हे या कार्यालयाकडे सातत्याने माहिती मागणीसाठी अर्ज करतात व संबंधित जन माहिती अधिकाऱ्यांना वेळी-अवेळी भ्रमणध्वनीवरुन फोन करुन असभ्य व असंसदीय भाषेत बोलत असतात', असे जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (पूर्व), मध्यवर्ती इमारत, 'बी' बरॅक, पुणे श्री.अतुल चव्हाण यांनी दि.१६/०७/२००९ च्या पत्रान्वये आयोगास सादर केलेल्या निवेदनात म्हटले आहे. श्री. बेनके यांनी आयोगाकडे सादर केलेल्या अपिलासोबतच्या दि.१५/१२/२००८ च्या पत्रांमध्येदेखील असंसदीय भाषा वापरली आहे, असे दिसून येते. अपीलकर्ता श्री. बेनके यांची सदरची कृती अयोग्य असून त्यांना याबाबत समज देण्यात येत आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे.
दि :- 11 JUN 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.सोपान लक्ष्मण गायकवाड
मु.पो.बोरीऐंदी, ता.दौंड,
जि.पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),**
जिल्हा परिषद पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष,**
श्रीनाथ शिक्षण प्रसारक मंडळ,
बोरीऐंदी, ता.दौंड, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८३७/पुणे |
| २ | अपिलासोबत माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने आवश्यक असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री. सोपान लक्ष्मण गायकवाड यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकाऱ्यांचे उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने सदरची कागदपत्रे सादर करण्याबाबत श्री.गायकवाड यांना आयोगाच्या दि.२८/०४/२००९ च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. तथापि

अद्यापही श्री.गायकवाड यांनी आवश्यक कागदपत्रे आयोगास सादर केलेली नाहीत. तरिही दि.२६/०५/२००९ व दि.१५/०७/२००९ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. सदर कार्यक्रमांस देखील अपीलकर्ता श्री.गायकवाड हे अनुपस्थित होते. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 18 JUN 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र ... खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

| | | |
|---|---|---|
| श्री. सतीश कलप्पा भरमशेट्टी<br>१३८, सरवदे नगर, मुळेगांव रोड, सोलापूर | | अपीलकर्ता |
| **विरूध्द** | | |
| **अपिलीय प्राधिकारी तथा** | शिक्षणाधिकारी (माध्यमिक ),<br>जिल्हा परिषद, सोलापर | उत्तरवादी |
| **जन माहिती अधिकारी तथा** | मुख्याध्यापक, सौ निलव्वाबाई खेडगी प्रशाला<br>अक्कलकोट, जि. सोलापूर | |

| | | |
|---|---|---|
| १ | **अपील क्रमांक** | २८४ / २०१० / सोलापूर |
| २ | **सुनावणीची तारीख** | २०.५.२०१० |
| ३ | **उपस्थित** | |
| | **अपिलीय प्राधिकारी तथा** | शिक्षणाधिकारी (माध्यमिक ),<br>जिल्हा परिषद, सोलापूर श्री. एम. एन. वीर |
| | **जन माहिती अधिकारी तथा** | मुख्याध्यापक, सौ निलव्वाबाई खेडगी<br>प्रशाला अक्कलकोट, जि. सोलापूर<br>श्री. चंद्रकांत तिप्पणा व्हनमाने |
| ४ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. सतीश कलप्पा भरमशेट्टी यांचा अर्ज आपल्याकडे आलेला नाही. राज्य माहिती आयोगाकडून सुनावणीची सूचना आल्यानंतर त्यांच्या अर्जाबाबत कार्यवाही केली. आयोगाकडून अर्जाची प्रत प्राप्त करून घेऊन माहिती तयार करून आणली आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सौ. निलव्वाबाई खेडगी प्रशाला, अक्कलकोट श्री. चंद्रकांत तिप्पणा व्हनमाने यांनी केले.

आयोगापुढील सुनावणीच्या वेळी संपूर्ण माहितीसह हजर राहण्यास जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सौ. निलव्वाबाई खेडगी प्रशाला, अक्कलकोट यांना आपण सूचना दिल्या होत्या. त्यांनी आणलेली माहिती अपीलकर्त्याच्या मागणीनुसार आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री. एम. एन. वीर यांनी नमूद केले.

संबंधित माहिती अपीलकर्त्यास निःशुल्क पुरविण्याचे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 22 JUN 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. सुधीर माधव जोशी
५८७, दत्तप्रसाद सोसायटी,
पुणे-सिंहगड रोड, पुणे-३०

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,**
तहसील कार्यालय हवेली,
जि.पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,**
तहसील कार्यालय हवेली,
जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८५४+२८५४(अ)/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २८/०५/२००८, |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २३/०८/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १२/०८/२००८ |
| ५ | **मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती :-** वडगांव बुद्रुक, सिंहगड रोड येथील सर्व्हे नं.१२ व कर्वे नगर, पुणे येथील सर्व्हे नं.१६, १८, १९, ९१ व ५३ या जागांचा सातबारा उतारा, फेरफार, जागेची मालकी, जागेच्या विक्रीसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडून मिळालेल्या परवानगीची छायाप्रत व विक्रीव्यवहारातून शासनास जमा करण्यात आलेली नजराण्याची रक्कम | |

## <u>विवेचन</u>

अपीलकर्ता श्री. सुधीर माधव जोशी यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबतच्या कागदपत्रांवरुन त्यांनी मागणी केलेली माहिती ही गावकामगार तलाठी कार्यालय, वडगांव बुद्रुक व गावकामगार तलाठी कार्यालय, कोथरुड यांच्याशी संबंधित असल्याने निवासी नायब तहसीलदार,

तहसील कार्यालय, ता.हवेली, जि.पुणे यांनी अपीलकर्त्याचे माहिती-मागणी अर्ज संबंधित गावकामगार तलाठयांकडे हस्तांतरित केले असून संबंधित गावकामगार तलाठी यांनी अपीलकर्ता श्री.जोशी यांना माहिती दिली असल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येते.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**पुणे.**
**दि :-** 11 JUN 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

| | | |
|---|---|---|
| श्री. रामदास वाल्मिकराव जंगम<br>४, पूजा कॉर्नर, गणेश महल, भोईरनगर, चिंचवडगाव, पुणे-४११ ०३३ | | अपीलकर्ता |
| **विरूध्द** | | |
| **जन माहिती अधिकारी तथा** | माहिती अधिकारी, पुणे विद्यापीठ,<br>गणेशखिंड रोड, पुणे | उत्तरवादी |
| **अपिलीय प्राधिकारी तथा** | कुलसचिव, पुणे विद्यापीठ,<br>गणेशखिंड रोड, पुणे | |

| | | |
|---|---|---|
| १ | **अपील क्रमांक** | २९१२ / पुणे |
| २ | **सुनावणीची तारीख** | २८.५.२०१० |
| ३ | **उपस्थित** | |
| | **अपीलकर्ता** | श्री. रामदास वाल्मिकराव जंगम<br>४, पूजा कॉर्नर, गणेश महल, भोईरनगर, चिंचवडगाव, पुणे-४११ ०३३ |
| | **जन माहिती अधिकारी तथा** | माहिती अधिकारी, पुणे विद्यापीठ,<br>गणेशखिंड रोड, पुणे<br>श्री. विजय चव्हाण |
| | **अपिलीय प्राधिकारी तथा** | कुलसचिव, पुणे विद्यापीठ,<br>गणेशखिंड रोड, पुणे तर्फे प्रतिनिधी<br>श्री. बी. डी. उढाणे |
| ४ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

**<u>विवेचन</u>**

राज्य माहिती आयोगाने दि. ४.४.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. २८.५.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली.

सुरक्षा कर्मचारी व स्वच्छक कर्मचारी यांच्या पुरवठ्यासंदर्भात आपण मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा माहिती अधिकारी, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड रोड, पुणे यांनी दिली नाही. १२ निविदा आलेल्या असतानाही रक्कम कमी करून पूर्वीच्या ठेकेदाराला काम दिले. दर कमी करण्याबाबतचा खुलासा मागितला असता दिला नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. रामदास वाल्मिकराव जंगम यांनी केली.

श्री. जंगम यांनी दि.३.१०.२००८ च्या अर्जान्वये मागितलेली माहिती दि. २३.१०.२००८ रोजी दिली. काही उपमुद्दे उपस्थित करून त्यांनी माहिती अपूर्ण असल्याच्या कारणावरुन अपिलीय प्राधिकारी तथा कुलसचिव, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड रोड, पुणे यांच्याकडे अपील केले. संबंधित सर्व संचिकेची पाहणी करून आवश्यक कागदपत्रांच्या प्रती घेण्याबाबत त्यांना कळविले. इतिवृत्ताच्या व टिप्पणीच्या प्रतीसह श्री. जंगम यांना आवश्यक असलेल्या अन्य कागदपत्रांच्या प्रतीही दिल्या, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा माहिती अधिकारी, पुणे विद्यापीठ श्री. विजय चव्हाण व अपिलीय प्राधिकारी तथा कुलसचिव, पुणे विद्यापीठ, यांचे प्रतिनिधी श्री. बी. डी. उढाणे यांनी केले.

ठेक्याचा दर कमी करण्याची कृती बेकायदेशीर आहे. एकाच घरात वडिलांना व मुलांना ठेका दिला असून भ्रष्टाचार लपविण्यासाठी खोटी व विसंगत माहिती दिली, असे प्रतिपादन श्री. जंगम यांनी केले. तथापि हे आक्षेप माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाचे नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 24 JUN 2010